**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# प्रश्न

दरवर्षीचा मार्च महिना हा मोठा वैशिष्ट्यपूर्ण असतो. याची कारणे दोन. एकतर, मराठी कालगणनेप्रमाणे या महिन्यात चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवीन वर्ष सुरू होते. दुसरे म्हणजे, ३१ मार्चला नवीन वित्तीय वर्ष सुरू होते. म्हणजे, इंग्रजी कालगणनेनुसार, जानेवारी महिन्यापासून सुरू होणा-या नवीन कॅलेंडर वर्षातील या तिस-या महिन्यात दोन नवीन वर्षांचा प्रारंभ होतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या दृष्टीनेही हा महिना लक्षणीय ठरतो कारण, दरवर्षीच्या एक एप्रिलपासून 'पत्रिके'च्या नवीन खंडाचा प्रारंभ होतो. फेब्रुवारी आणि मार्च हे दोन महिने म्हणजे एका अर्थाने आर्थिक आघाडीवर धामधूम असणारे महिने होत. केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांची वार्षिक अंदाजपत्रके याच कालावधीत सादर केली जातात. सरकारच्या वित्तीय व्यवहारांचा लेखाजोखा असे जरी अर्थसंकल्पांचे गाभास्वरूप असले तरी, अंदाजपत्रकांच्या निमित्ताने देशासमोरील वा राज्यासमोरील मुख्य प्रश्नांचा ऊहापोह जाणीवपूर्वक केला जातो. गंमत अशी दिसते की, या सगळ्या चर्चामंथनात उजळणी होते ती केवळ प्रश्नांचीच. समाजासमोर उभ्या असणा-या सगळ्याच जरी नाही तरी काही मुख्य मुख्य प्रश्नांना उत्तरे मिळतात अथवा उत्तरे असतात, असे चित्र काही या रणधुमाळीतून निष्पन्न होत नाही. यंदाचे वर्ष त्या दृष्टीने लक्षणीयच म्हटले पाहिजे. सगळीकडे केवळ प्रश्नच प्रश्न दिसतात. महागाईचा प्रश्न, विजेचा प्रश्न, अन्नधान्यांच्या पुरेशा उपलब्धतेचा व सुरळीत पुरवठ्याचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, सिंचनाचा प्रश्न, शेतीची उत्पादकता वाढविण्याचा प्रश्न, शैक्षणिक क्षेत्रातील समस्यांचा प्रश्न, शेतक-यांच्याच जोडीने आताशा होणा-या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न, वित्तीय संकटाचा सामना करणा-या भारतीय कॉर्पोरेट विश्वाची स्पर्धात्मकता टिकवून धरण्याचा प्रश्न, सरकारच्या तिजोरीतील तूट भरून काढण्याचा प्रश्न, व्याजदरांमधील वाढ रोखण्याचा प्रश्न, पर्यावरणाचे संतुलन राखण्याचा प्रश्न... प्रश्न, प्रश्न आणि केवळ प्रश्नच. त्यातच भर पडते ती राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अन्य प्रश्नांची. अनेक प्रश्न वर्षानुवर्षे लोंबकळत राहिल्याने प्रश्नांची संख्या



वाढत जाते हे तर आहेच; पण, एक प्रश्न सोडवायला घेतला की त्याच्या पोटातून दुसरेच प्रश्न निर्माण होतात, हेही तितकेच खरे. यातून निर्माण होतो केवळ गुंता. या गुंत्यातच आपण गुंतत जात आहोत की काय, अशी शंका उत्तरोत्तर बळकट होत जाते. बाहेर पडण्याचा मार्गच नाही. हे का होत असावे ?......प्रश्नांचे आमचे आकलनच अपुरे आणि सदोष आहे म्हणून की, प्रश्नांचे स्वरूपच इतके व्यामिश्र आणि भीषण आहे की त्यांचे निराकरण दुर्घटच आहे म्हणून ? की, समोरच्या प्रश्नांचा निचरा लगोलग करून टाकण्याबाबत आमची राजकीय इच्छाशक्तीच मंदावल्याचा तो अपरिहार्य परिणाम आहे ? का, मुळात या प्रश्नांवर तोडगे शोधण्यासाठी समाजाच्या विविध स्तरांवर संवादाचे जे पूल तयार करणे अत्यावश्यक ठरते, त्या बाबतीत आम्ही कमी पडतो आहोत, हेही समजत नाही. कधी कधी असेही वाटते की, या प्रश्नांना भिडण्याचा आमचा 'ॲप्रोच'च चुकतो आहे. आजच्या समस्यांचे स्वरूपच आरपार बदललेले आहे आणि त्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न मात्र आम्ही करतो आहोत ते कालचे विचारव्यूह उराशी घट्ट बाळगून, असेही काहीसे घडत असावे. आमच्या समाजजीवनातही किती तरी मूलगामी बदल होताना दिसतात. संसदेत हक्काचे प्रतिनिधित्व मिळावे यासाठी आपल्या देशात महिलांना झगडावे लागत असताना तिकडे पाश्चात्य देशांमधील श्रमदलात महिलांनी ५० टक्क्यांचा टप्पा आज पार केला आहे. या सगळ्या घडामोडींचे प्रश्नांबरोबरच्या आमच्या लढाईवर काय परिणाम संभवतात, हाही अखेर एक प्रश्नच ! ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# द्रष्ट्या विचारवंताचे उपेक्षित चिंतन

नवीन 'आयडिऑलजी'चा शोध घेण्याच्या निकडीबाबत आताशा बरेच काही बोलले-लिहिले जाते. साम्यवाद, समाजवाद, मार्क्सवाद... यांसारखे आजवरचे आघाडीचे सर्वच विचारव्यूह मानवसमाजासमोर आजमितीस उभ्या ठाकलेल्या विविध समस्यांचे समाधानकारक निराकरण करण्यास बव्हंशी असमर्थ ठरले असल्याचे चित्र दिसत असल्याने नवीनच 'आयडिऑलजी' शोधण्यावाचून आता गत्यंतर नाही, असा एक सूर अलीकडे आळविला जाताना दिसतो. खुल्या बाजारपेठीय मुक्त व्यवहारांवर बेतलेल्या आर्थिक व्यवस्थेच्या अंगभूत मर्यादांचा साक्षात्कार २००८ सालातील सप्टेंबर महिन्यात निपजलेल्या वित्तीय अरिष्टाने घडविल्याने त्या तत्त्वज्ञानाच्या अपुरेपणाची जाणीवही चांगलीच ठसठसते आहे. त्यातून, पुन्हा एकवार केन्सवादाची महती पुनःप्रस्थापित होताना दिसते आहे. एकंदरच, सध्याचा सगळाच माहौल वैचारिक मंथन-घुसळणीचाच दिसतो.

सध्या प्रचलित असणा-या 'आयडिऑलजीं'च्या अपुरेपणाबाबतचे हे असमाधान आजच उफाळून आलेले आहे, अशातला भाग मुळीच नाही. किंबहुना, डॉ. राममनोहर लोहिया आज असते तर विविध विचारव्यूहांच्या सूक्तासूक्ततेबाबतच्या या विचारमंथनात त्यांनी किती हिरिरीने सहभाग घेतला असता, हा विचार मनात उमटल्यावाचून राहत नाही. हा विचार मनात प्रकर्षाने आजच उमटण्याचे कारण म्हणजे २३ मार्च २०१० रोजी पूर्ण झालेले डॉ. लोहिया यांचे जन्मशताब्दी वर्ष. मराठी विचारविश्वात या वास्तवाची जाणीवपूर्वक दखल घेतली गेल्याचे फार काही दिसले नाही. गेल्या वर्षभरात प्रासंगिक स्वरूपाचे काही कार्यक्रम झाले. परंतु, मार्क्सवाद, साम्यवाद वा समाजवादासारख्या विचारप्रणाली त्यांच्या मूळ स्वरू पात भारतासारख्या विकसनशील देशात अपु-याच का ठरतात या संदर्भात लोहिया यांनी ६० वर्षांपूर्वी मांडलेले मूलभूत चिंतन त्यांच्या जन्मशताब्दी वर्षातही उपेक्षितच राहिले, असे म्हणण्यावाचून पर्याय नाही.



देशाच्या सर्वांगीण उन्नतीसंदर्भात स्वयंप्रज्ञेने, चौकटीच्या बाहेर जाऊन काही मूलभूत नवदर्शन मांडणा-या मोजक्या क्रियाशील विचारवंतांमध्ये डॉ. राममनोहर लोहिया यांचा समावेश अग्रक्रमाने होतो. परकीय सत्तेच्या बहुआयामी जोखडाखालून मुक्त झालेल्या भारतासारख्या मागास देशाच्या विकासाचे नेहरू प्रणित 'मॉडेल' ज्या काळात आकाराला येत होते त्या काळात त्या विचारसरणीचे पर्यायी प्रतिमान मांडत त्याच्या पुष्ट्यर्थ सैद्धांतिक विचारव्यूहाची मांडणी करण्याची प्रखर बौद्धिक क्षमता अंगी असणा-या लोहिया यांच्यासारख्या समाजमनस्क व्यक्तिमत्त्वाचे मूलगामी चिंतन आजही पथदर्शक आणि विचारप्रवृत्त करणारे आहे. ते कोणाला पटेल वा पटणारही नाही. त्या विचारव्यूहाच्या व्यवहार्यतेबाबत शंकाही उपस्थित केल्या जाऊ शकतील. मात्र, भारतासारख्या मागास, परंपरानुगतिक, वासहतिक अर्थव्यवस्थेच्या विकासप्रक्रियेदरम्यान मार्क्सवादी अथवा केवळ उत्पादनशक्ती व उत्पादनसाधनांच्या सार्वजनिक मालकीवरच भर देणारी समाजवादी विचारप्रणाली पर्याप्त का व कशी ठरणार नाही, यांबाबत डॉ. लोहिया यांनी तेव्हा केलेले द्रष्टे विवेचन आजही विचारार्ह ठरते, हे निर्विवाद.

डॉ. लोहिया यांनी भारतातील परिस्थितीसंदर्भात मार्क्सवादाच्या केलेल्या चिकित्सेचा आपण इथे वानगीदाखल विचार करू . संपूर्णपणे शोषणरहित व्यवस्थेच्या निर्मितीकडे समाजाच्या होणा-या वाटचालीदरम्यान भांडवलशाहीतील अंतर्विरोधातूनच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा अंत उद्भवतो, हा मार्क्स यांचा सिद्धांत भारतासारख्या देशात अपुरा आणि गैरलागू ठरतो, असे प्रतिपादन करताना लोहिया यांनी भांडवलशाहीसंदर्भातील मूळ मार्क्सप्रणित सिद्धांतातील कच्चे दुवे अतिशय नेमकेपणाने मांडले आहेत. उत्पादनशक्ती अथवा उत्पादनव्यवस्था आणि उत्पादनसंबंध यांच्यादरम्यानच्या संघर्षात भांडवलशाहीची आहुती पडते, हा मार्क्स यांचा सिद्धांत 'अतिरिक्त मूल्य' या पायाभूत संकल्पनेवर तोललेला आहे. भांडवलदार आणि मजूर हे भांडवलशाहीतील दोन मुख्य वर्ग. भांडवलदार वर्गाचे भांडवल आणि मजुरवर्गाची श्रमशक्ती यांच्या सहयोगातून वस्तू व सेवांचे उत्पादन होते. उत्पादनाच्या या प्रक्रियेत जे मूल्य निर्माण होते त्यात मार्क्स यांनी एक वर्गीकरण केलेले आहे.

## उत्पादित मूल्य, श्रममूल्य आणि अतिरिक्त मूल्य

भांडवलाच्या साहाय्याने श्रमिक जे उत्पादन करतात त्या उत्पादनाच्या मूल्याला मार्क्स 'उत्पादन अथवा उत्पादित मूल्य' असे म्हणतात. तर, मजुरांनी पुरविलेल्या श्रमशक्तीचा जो मोबदला भांडवलदार त्यांना देतो त्याला मार्क्स 'श्रममूल्य' असे संबोधतात. आता इथे एक गंमत आहे. मजुराला त्याने पुरविलेल्या श्रमशक्तीबद्दल मालक अदा करतो ते श्रममूल्य आणि श्रमिकाने तयार केलेल्या वस्तू अथवा सेवेचे उत्पादन मूल्य यांत तफावत असते. या तफावतीला मार्क्स यांनी नाव दिले आहे 'अतिरिक्त मूल्य'. हे अतिरिक्त मूल्य निर्माण करतो श्रमिक मात्र त्यावर त्याचा शून्य हक्क असतो. हे अतिरिक्त मूल्य जमा होते मालक अथवा भांडवलदाराच्या गाठी. भांडवलशाहीतील भांडवलाची निर्मिती, भांडवलाचा संचय आणि भांडवलाची वाढ यांचा मूलस्त्रोत म्हणजे हेच अतिरिक्त मूल्य. उत्पादनप्रक्रियेच्या विकास-विस्ताराबरोबरच या अतिरिक्त मूल्यातही वाढ होत राहते. त्यातून भांडवलदाराच्या गाठीशी अधिकाधिक भांडवलाचा संचय होत राहतो. भांडवलदार हे भांडवल पुन्हा व्यवसायात गुंतवतो. उत्पादनाचा वेग वाढवण्याच्या दृष्टीने उत्पादनप्रक्रियेत यंत्रांचा वापर करण्याकडे प्रवृत्ती वाढते. भांडवल गुंतवणुकीद्वारे यांत्रिकीकरणाला चालना मिळते. यातूनच भांडवलाचे केंद्रीकरण होत राहते.

उत्पादनप्रक्रियेत श्रमशक्तीच्या ठिकाणी यंत्रशक्तीची योजना होण्याने उमटणारे पडसाद दुहेरी असतात. एकीकडे यांत्रिकीकरण आणि भांडवलाचे केंद्रीकरण वाढत्या श्रेणीने चालू राहते तर, दुसरीकडे काम करणा-या हातांची जागा यंत्रांनी घेतल्याने समाजातील बेरोजगारी वाढू लागते. कालांतराने अशा बेरोजगारांच्या फौजा भांडवलशाही व्यवस्थेत ठिकठिकाणी दिसू लागतात. एकीकडे कारखानदारीचा विस्तार होत राहतो तर, दुसरीकडे बेरोजगारांच्या या फौजेतही नव्याने होणारी भरती अखंड चालूच राहते. या बेरोजगारीतून निपजते गरीबी. गरिबीतून उपजते हलाखी. भांडवलदारांच्या हातात होणारे भांडवलाचे एकत्रीकरण आणि दुसरीकडे श्रमिकांच्या जगात फोफावणारी हलाखी यांचे साहचर्य हे भांडवलशाहीच्या विकसित अवस्थेचे हुकुमी लक्षण ठरते.



या विरोधाभासातच भांडवलशाहीच्या नाशाचे बीजारोपण घडून येते. भांडवलदार वर्गाच्या हातात भांडवलाचे होणारे सातत्यशील केंद्रीकरण आणि श्रमिकांच्या विश्वात मुरत जाणारे दारिद्र्य यांची अपरिहार्य परिणती व्यापक स्तरावरील सामाजिक असंतोष फैलावण्यात घडून येते. याच असंतोषाचे पर्यवसान, यथावकाश, भांडवलदार व श्रमिक या दोन समाजसमूहांदरम्यान संघर्ष निर्माण होण्यात घडून येते. संघर्षाचा हा भडका इतका सर्वसंहारक असतो की त्यात भांडवलशाही समाजव्यवस्थेची पूर्ण आहुती पडते. भांडवलशाहीच्या विकासातच तिच्या लयाची मुळे कशी रुजत जातात, याची मार्क्स यांनी मांडलेली उपपत्ती ही अशी आहे.

मार्क्स यांच्या या सिद्धांतातील एक महत्त्वाचा कच्चा दुवा डॉ. लोहिया अतिशय नेमकेपणाने मांडला आहे. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर - ''अतिरिक्त मूल्य, वर्गसंघर्ष आणि अंतिम क्रांती या कल्पनांचा समावेश असलेल्या मार्क्सवादी सिद्धान्तात निहित असलेला जो अंतर्गत तर्क आहे, त्याची तपासणी केली पाहिजे. पहिली गोष्ट अशी, की पश्चिम युरोपमधील भांडवलशाहीच्या संदर्भातच मार्क्सने एकंदर भांडवलशाही व्यवस्थेची मीमांसा केली आहे. ही गोष्ट खरी, की भांडवलशाहीचा जन्म पश्चिम युरोपातच झाला आणि तेथेच संपूर्ण विकास झाला. तथापि, तिच्या विकासामागे साधनसामग्रीची शक्ती होती, ती ब-याच मोठ्या प्रमाणात तिला युरोपच्या साम्राज्यवादी वर्चस्वाखाली असलेल्या युरोपाबाहेरील देशांमधून प्राप्त झाली होती. म्हणून भांडवलशाहीच्या विकासाचे नीट आकलन करून घेण्यासाठी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विचार केवळ पश्चिम युरोपमधील अर्थव्यवस्थेच्या संदर्भात करून भागणार नाही. युरोपातील अर्थव्यवस्था हे शेवटी व्यापक भांडवलशाहीचे आतले वर्तुळ आहे. या वर्तुळाच्या विकासाला गती देणारे युरोपेतर जगातील अर्थव्यवस्थेचेही दुसरे एक बाहेरचे वर्तुळ आहेच. मार्क्सच्या परिभाषेत सांगायचे, तर या बाह्य वर्तुळातून पश्चिम युरोपीय भांडवलशाहीने आपले 'अतिरिक्त मूल्य' प्राप्त केले, त्या वर्तुळाचे शोषण केले. काही झाले, तरी भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा केवळ युरोपच्या संदर्भात विचार करणे किंवा ती काही विशिष्ट देशांपुरतीच होती, असे मानणे मूलतः चुकीचे आहे. भांडवलशाहीचे

विश्लेषण तिच्या राष्ट्रीय व विश्वव्यापी या दोन्ही स्वरूपांच्या संदर्भातच केला पाहिजे आणि या दोन स्वरूपांतील नाते शोषक व शोषित असेच आहे''. भांडवलशाहीच्या विकाससंदर्भात मार्क्स यांनी मांडलेल्या सिद्धांतांना, भांडवलशाही व्यवस्थेचा परिपोष करणारे शासक पश्चिमी देश आणि अतिरिक्त मूल्याच्या निर्मितीमध्ये जुंपले गेलेले पूर्वेकडील वासहतिक देश, अशा पृथक विभागणीचे जोडले गेलेले भौगोलिक परिमाण स्वच्छपणे उलगडून दाखविणे, हे लोहिया यांनी मांडलेल्या मार्क्सवादी विचारसरणीच्या चिकित्सेचे असाधारणत्व होय.

**मूळ सिद्धांत आणि सुधारणेची दिशा**

या भौगोलिक परिमाणाचे नीट आकलन झाले नाही तर, भांडवलशाही व्यवस्थेच्या विकास व नाशाच्या मार्क्सप्रणित सिद्धांतनाचे उपयोजन भारतासारख्या मागास, वासहतिक देशात करण्यात कोणती मूलभूत गफलत होते, यांबाबत डॉ. लोहिया यांनी केलेले विवेचन त्यांच्या स्वयंप्रज्ञेचा साक्षात्कार घडविणारे असेच आहे. डॉ. लोहिया लिहितात - ''ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेमध्ये अतिरिक्त मूल्यांचा जो वाटा होता, तो ब्रिटिश भांडवलदारांना ब्रिटिश कामगारांकडून मिळालेल्या अतिरिक्त मूल्यातून निर्माण झालेला फारसा नव्हता, तर हिंदुस्थानातील सर्व जनतेकडून ब्रिटनमधील सर्व जनतेला मिळालेले ते अतिरिक्त मूल्य होते, ही गोष्ट कोणालाही नाकारता येणार नाही.....भांडवलशाहीचा विकास, आर्थिक केंद्रीकरण व वाढती गरिबी आणि कामगारांचे संघटन या तिन्ही गोष्टी एकाच वेळी होतात आणि त्यांतून भांडवलशाहीचा विनाश ओढवतो. या तिन्ही गोष्टी एकाच वेळी होतात, यावरच मार्क्सने आपल्या क्रांतीचा सिद्धान्त आधारला आहे. म्हणूनच जेथे भांडवलशाहीचा पूर्ण विकास झाला आहे, अशा देशातच ती प्रथम कोसळेल, असे मार्क्स म्हणतो. तथापि, हा सिद्धान्त संपूर्णपणे चुकीचा आहे. मी मार्क्सवादी असतो, तर अलीकडे जी माहिती प्राप्त झाली आहे, ती लक्षात घेऊन या सिद्धान्तात सुधारणा केली असती''. भांडवलसंचयन एका देशात तर त्या भांडवलाचा मूलस्त्रोत असणा-या अतिरिक्त मूल्याची निर्मिती दुस-या देशात घडून येते तेव्हा उद्‌भवणा-या समस्येचे स्वरूप निव्वळ सैद्धांतिकच नसते.



या समस्येची आणि तिच्यातून निपजणा-या अंतर्विरोधाची सैद्धांतिक तसेच शुद्ध व्यावहारिक परिमाणे अचूक हेरणे, हे मार्क्सवादाच्या लोहियाप्रणित चिकित्सेचे सर्वांत मोठे आगळेपण होय. लोहियांच्या प्रतिपादनानुसार - ''मार्क्सने सांगितलेल्या तिन्ही गोष्टी अस्तित्वात आल्या आहेत - भांडवलाचे केंद्रीकरण झाले आहे, कामगारवर्गाचे समाजीकरण झाले आहे आणि गरिबी वाढली आहे. पण मार्क्सची एक चूक झाली. एकाच देशाच्या –- उदा., ब्रिटिश किंवा जर्मन - अर्थव्यवस्थेमध्ये या तिन्ही गोष्टी घडतील, असे त्याने मानले. या तिन्ही गोष्टींचा अलग अलग विचार केला, तर काय दिसते ? भांडवलाचे केंद्रीकरण व कामगारवर्गाचे समाजीकरण युरोप-अमेरिकन अर्थव्यवस्थेत झाले, तर वाढती गरिबी अविकसित देशांत दिसून आली. अशा रीतीने जगाच्या दोन विभागांत वरील तीन गोष्टी दोन भागांत वाटल्या गेल्या. भांडवलशाही विकाससंबंधीच्या मार्क्सवादी विश्लेषणास अशी पुस्ती जोडल्यावर असा निष्कर्ष निघतो, की ज्या देशात गरिबी वाढत राहील, त्या देशात भांडवलशाही व्यवस्था कोलमडेल''. असे घडले तर भारतासारख्या मागास देशावर त्या घटिताचे काय परिणाम संभवतील ?

या संदर्भात डॉ. लोहिया यांनी केलेले विश्लेषण आजही तितकेच लागू पडणारे आहे. लोहिया म्हणतात - ''विकसित अर्थव्यवस्था असलेल्या देशांतच भांडवलशाही व्यवस्था कोसळेल, असा मार्क्सचा निर्णय असल्याकारणाने त्याला दुसरी कोणती चिंता करण्याचे कारणच नव्हते. कारण त्याच्या कल्पनेप्रमाणे त्या समाजात विकसित उत्पादनशक्ती आधीपासूनच अस्तित्वात असणार. त्यांच्यावरचे भांडवलशाही प्रभुत्व नाहीसे करून, त्याजागी सामाजिक प्रभुत्व स्थापित केले, की संपले. एकदा उत्पादनशक्तीवर सामाजिक प्रभुत्व स्थापन झाले, की मग अर्थव्यवस्था आपोआप प्रगती करू लागेल आणि जनतेच्या गरजा पूर्ण होऊ लागतील. परंतु भांडवलशाही विकासाचा हा सिद्धान्त मूलतः चुकीचा असल्यामुळे त्यातून निघणारी वरील मार्क्सप्रणीत अनुमानेही चुकीची आहेत. त्यांचा नव्याने पुनर्विचार झाला पाहिजे. भांडवलशाहीची साखळी हिंदुस्थानात तुटणार आहे, असे क्षणभर मानू. पण काय हे शक्य आहे ? प्रतिकामगार फक्त १५० रुपयांचे भांडवल येथील उद्योगधंद्यांत ***(कृपया पृष्ठ १४ पाहावे)***

कामगार

# आता प्रवास ‘यांग’कडून ‘यिन्’कडे...?

नावात काय आहे .... ? काय नाही विचारा ! अगदी जगणे-मरणेही नावावरच अवलंबून असते.... आणि तेही पुन्हा एखाद्या व्यक्तीचे नाही तर, चक्क कंपन्यांचेही !! ‘लेहमन ब्रदर्स’ या जगविख्यात संस्थेचे १५ सप्टेंबर २००८ रोजी दिवाळे निघाले तेही तिच्या नावात ‘ब्रदर्स’ हे पद असल्यामुळेच, असा पूर्वपक्ष आजमितीस अमेरिकेत मांडला जात आहे. समजा, संस्थेच्या नावात ‘ब्रदर्स’ऐवजी ‘सिस्टर्स’ असते तर ‘लेहमन सिस्टर्स’ तरली असती, असा अमेरिकेतील अनेक तज्ज्ञ सल्लागारांचा आज दावा आहे. कारण, व्यक्ती काय अथवा संस्था वा कंपनी काय, तिच्या नावातून तिची प्रेरणाप्रवृत्ती बाह्य जगात दृग्गोचर होत असते, तिच्या कार्यप्रणालीत झिरपत असते. ‘ब्रदर्स’ हे पद पुरुषवाचक आहे तर, ‘सिस्टर्स’ हे स्त्रीवाचक. पुरु ष आणि स्त्री यांच्या स्वभावविषेशांत निसर्गतःच जमीनअस्मानाचा फरक मानला गेलेला आहे. पुरु ष आक्रमक असतो. कुरघोडीची अंगभूत प्रेरणा, कमालीची स्पर्धात्मकता, जोखीम स्वीकारण्याची खुमखुमी ही सारी पुरु षी अहंकाराची जपणूक करणारी साधनसामग्री. तर, स्त्री या सगळ्याच्या बरोबर उलट.

‘लेहमन ब्रदर्स’च्या दिवाळखोरीतून प्रसवलेल्या जागतिक वित्तीय अरिष्टाची रु जवण अशा पुरु षी, आक्रमक, स्पर्धात्मक मूल्यव्यवस्थेतच झाली आहे अथवा असावी, असा एक मतप्रवाह विकसित देशांमधील संशोधक, विद्वान, सल्लागार तज्ज्ञांच्या वर्तुळांत सध्या फिरताना दिसतो. परंतु, हे निरीक्षणही वस्तुस्थितीला पूर्णपणे धरू न नाही. कारण, अशा प्रकारच्या मूल्यव्यवस्थेचा अतिरेक अर्थ-वित्तविश्वाची बदलती मूलप्रकृती बघता अंतिमतः घातकच ठरेल, हे भान वित्तीय अरिष्टाचा फुगा फुटण्यापूर्वी जगभरातील ‘कॉर्पोरेट’ विश्वामध्ये बरेच आधी बिंबत होते, असा याच क्षेत्रातील जाणकारांचा दाखला आहे. पाश्चात्य राष्ट्रांमधील श्रमदलांत अनुभवास येणारे बदलही या वास्तवास पूरक असेच आहेत.



जगाच्या विकसित पट्ट्यातील श्रमदलाच्या जडणघडणीत अलीकडील काळात अतिशय मूलभूत स्वरूपाचे गुणात्मक बदल साकारताना दिसतात. कामगारविश्वात महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढलेला आहे, वाढतो आहे हा तो महत्त्वाचा बदल. महिलांचे अमेरिकी श्रमदलातील प्रमाण आजमितीस जवळपास ५० टक्क्यांवर पोहोचलेले आहे. स्पेनसारख्या देशातील चित्रही यापेक्षा फारसे निराळे नाही. श्रमदलातील या बदलत्या लिंग गुणोत्तराची पाळेमुळे देशोदेशींच्या उच्च, विद्यापीठीय शिक्षणव्यवस्थेत स्वाभाविकरीत्या रु जलेली दिसतात. जगाच्या युरोप-अमेरिकादी प्रगत, विकसित भूभागातील उच्च शिक्षणाच्या विश्वात विद्यापीठीय पदवीधारकांमध्ये मुलींची संख्या चांगली ६० टक्क्यांच्या घरात गेलेली दिसते. १९६३ सालातील आकडेवारी बघितली तर, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेल्या एकंदर अमेरिकी मुलींपैकी जवळपास ६२ टक्के मुली व स्त्रिया श्रमदलात सहभागी होत असत. आज हेच प्रमाण ८० टक्क्यांवर गेलेले आहे. आर्थिक व्यवहारोद्योगांमधील महिलांचा हा वाढता सहभाग सर्वस्तरीय आहे. श्रमदलात महिला पूर्वीही होत्या. मात्र, त्यांच्या वाट्याला येणा-या जबाबदा-या व कामे बव्हंशी गौण, निम्नस्तरीय अशीच असत. परंतु, आजचे चित्र पूर्णपणे बदललेले दिसते. अणुऊर्जा, खाणउद्योग, तेल व रसायने, शेतमालप्रक्रिया, तंत्रज्ञान यांसारख्या अत्याधुनिक उद्योगक्षेत्रांतील विख्यात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उच्चस्तरीय व्यवस्थापनात महिला महत्पदांवर कार्यरत आहेत.

अर्थात, यातही डावे-उजवे आहेच. इटली व जपानसारख्या देशांतील श्रमदल आजही पुरु षप्रधानच दिसते. या देशांतील पुरु षांचा रोजगार दर आणि महिलांचा रोजगार दर यांत भरपूर तफावत अनुभवास येते. या उभय दरांमध्ये लहानसहान नाही तर, चांगला २० टक्क्यांचा फरक आहे. सरासरी वेतनमानातही लिंगभेद भरपूर दिसतो. महिलांना मिळणारा मासिक वा वार्षिक सरासरी मेहेनताना पुरु षांना मिळणा-या सरासरी मेहेनतान्यापेक्षा लक्षणीयरीत्या कमी असतो. या देशांतील ‘ग्लास सीलिंग’ही चांगलेच तगडे आहे. कंपन्यांच्या उच्चस्तरीय निर्णयप्रक्रियेत असणारा महिलांचा सहभाग पुरु षांच्या तुलनेत अल्पच दिसतो. परंतु, एकंदरीने पाहता पूर्वापार असलेल्या या चित्रात जगभरच वेगाने बदल घडून येत आहेत.

अर्थउद्योगांसह एकंदरच श्रमविश्वात वेगवेगळ्या स्तरांवर उंचावलेला स्त्रियांचा आजचा सहभाग हा अनेकानेक घटकांचा एकत्रित परिणाम आहे. यांत राजकीय प्रांतातील सुधारणा-घडामोडींची भूमिका कळीची ठरलेली दिसते. जगभरातील स्त्रीवादी तसेच स्त्रीमुक्तिवादी चळवळींचा रेटा तर अतिशयच महत्त्वाचा. यातून, जीवनाच्या विविध क्षेत्रांत महिलांचा समानाधिकार प्रतिष्ठित करणा-या कायदेविषयक तसेच वैधानिक तरतुदी व्यवहारात अवतरल्या. मार्गारेट थॅचर आणि हिलरी क्लिंटन यांच्यासारख्या धुरीणांनी स्वतःच्या ठायी वसणा-या कर्तेपणाबाबतचा महिलांचा विश्वास बुलंद बनविला. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि त्यांतही उच्च शिक्षणाच्या संधींचा प्रसार चौफेर झाल्याने स्त्रियांच्या अंगी असणा-या उपजत गुणांना शिक्षणाचे अस्तर लाभले. त्यातून, महिलांच्या अंगभूत कलात्मक गुणांची उत्पादकता वाढण्यास मदत झाली. त्याद्वारे, अर्थउद्योगातील महिलांचा सहभाग अर्थपूर्ण ठरण्याच्या दिशा उजळल्या.

विस्तारणा-या व्यावसायिक क्षितिजावर ठसा उमटवण्याजोगी परिस्थितीही वैद्यक तसेच तंत्रशास्त्राच्या क्षेत्रात साकारलेल्या बहुविध सुधारणांमुळे निर्माण झाली. एकतर, घरगुती कामांचे सुलभ यांत्रिकीकरण घडून आल्याने स्वयंपाकघर तसेच घराच्या देखभालीत व्यस्त होणा-या वेळेत बचत झाली. परिणामी, घरकाम उरकून घराबाहेर कारणी लावता येण्याइतपत वेळ महिलांच्या हाताशी आला. आर्थिक स्वावलंबनामुळे सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला अर्थपूर्णता लाभली. संततीनिरोधनाची साधने व्यवहारात आल्यानंतर तर अपत्यसंभवासारख्या अतिशय संवेदनशील आणि निखळ वैयक्तिक स्वरुपाच्या निर्णयाबाबतचे स्वातंत्र्यही स्त्रीच्या कक्षेत आले. सगळ्यात मुख्य म्हणजे, चौफेर घडून आलेल्या वैज्ञानिक तसेच तांत्रिक प्रगतीमुळे एकंदरच उत्पादनप्रक्रियेतील अंगमेहनतीची, अंगबळाच्या उपयोजनाची अनिवार्यता एकदम कमी झाली. महिलांचा अर्थउद्योगातील सक्रिय सहभाग वाढण्यास तुलनेने सर्वांत उपकारक ठरणारी बाब हीच होय. कारण, आंगिक बळाच्या बाबतीत महिलांच्या तुलनेत पुरुष निर्णायकरीत्या सरस ठरत असत. आता तर, एकंदरच अर्थव्यवहारांची जडणघडणच बदललेली आहे. ***(कृपया पृष्ठ १८ पाहावे)***



***(पृष्ठ क्रमांक १० वरून)***

गुंतले आहे. एवढेसे भांडवल घेऊन येथील अर्थव्यवस्थेचा विकास कसा करणार ? भारतीय अर्थव्यवस्थेवरचे भांडवलशाही नियंत्रण दूर झाले, तर काय होईल ? काही अशा कठीण समस्या निर्माण होतील, की ज्यांचा मार्क्सवादाने विचारच केलेला नाही. कारण मार्क्सवादानुसार भांडवलशाही नियंत्रण नष्ट झाल्यावर मुळी कोणती समस्याच शिल्लक राहत नाही. उलट, अविकसित देशात तर भांडवलशाही-नियंत्रण नष्ट झाल्यावर अनेक समस्या उद्भवत असतात''. प्रचलित वास्तवालादेखील ही मीमांसा लागू होत नाही काय ? ■■

## निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

आर्थिक

# मंदीसारिखा नाही गुरू...

शिकण्यासाठी गुरूची आवश्यकता असते, हे मान्य. परंतु, केवळ गुरू असूनही भागत नाही. मुख्य गरज असते ती शिकण्याच्या वृत्तीची. मुळात काही तरी शिकण्याची प्रवृत्तीच नसेल तर तज्ज्ञातला तज्ज्ञ जरी शिक्षक म्हणून लाभला तरी काय उपयोग? म्हणजेच, प्रश्न हा इच्छाशक्तीचा असतो. सतत शिकण्याची, शिकण्यातून आपल्या चुका सुधारण्याची वृत्ती असलेला माणूस मानवी गुरूंची वाट बघत थांबत नाही. तो प्रत्येक क्षणी शिकत राहतो. भवतालच्या परिस्थितीलाच तो गुरू मानतो. भारतीय कॉर्पोरेट क्षेत्राने १५ सप्टेंबर २००८नंतर नेमका हाच पाठ गिरवलेला आहे. वैश्विक स्तरावरील वित्तीय संकटापायी युरोप-अमेरिकादी प्रगत बाजारपेठांमध्ये अवतरलेल्या मंदीतून भारतीय संघटित उद्योगक्षेत्र खूप काही शिकले. त्या मानाने या वित्तीय संकटाची म्हणावी अशी झळ भारतीय अर्थव्यवस्थेला पोहोचली नाही. भारतीय संघटित उद्योगविश्वातील पाच-सहा उद्योगक्षेत्रांनाच काय तो परकीय बाजारपेठांतील मंदीचा उपसर्ग जाणवला. मात्र, या धगीतून तावून सुलाखून निघत असतानाच भारतीय कॉर्पोरेट विश्वातील अग्रगण्य उद्योजकांनी गाठीशी बांधलेले अनुभवजन्य ज्ञान आणि शिकलेले धडे खरोखरच अंतर्मुख बनविणारे आहेत.

व्यवस्थापनशास्त्राच्या कोणत्याही विद्यापीठात असे रोकडे शिक्षण मिळाले नसते. मुख्य म्हणजे, वित्तव्यवहार, माहिती तंत्रज्ञान, बँकिंग, वाहननिर्मिती यांसारख्या उद्योगक्षेत्रांत अग्रेसर असणा-या कंपन्यांच्या धुरीणांनी अनुभवलेले हे धडे 'मॅक्रो' स्वरूपाचे नाहीत. तर, ते आहेत त्या त्या कंपनी वा उद्योगसमूहाच्या स्तरावरचे. तसेच, हे ज्ञान केवळ सैद्धांतिक वा पुस्तकी नाही. तर ते आहे परिस्थितीच्या चटक्यांतून निपजलेले. त्याचमुळे, उद्योगव्यवसायाच्या क्षेत्रातील लहानथोरांना ते जितके उपयुक्त तितकेच अनुकरणीयही वाटावे. बरे, यात विषयांचेही वैविध्य भरपूर आहे. व्यवस्थापनापासून ते थेट नवसंशोधनापर्यंत नाना गोष्टी त्यात आहेत.



मनुष्यबळाची विपुलता हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक मुख्य वैशिष्ट्य गणले जाते. विकसित बाजारपेठांमधील मंदीमुळे भारतीय कंपन्यांना त्यांच्याजवळील प्रशिक्षित मनुष्यबळाचे मोल आणि महत्ता प्रकर्षाने जाणवल्याचे दिसते. एखाद्या गोष्टीचे महत्त्व माहित असणे आणि त्या माहात्म्याची प्रचीती येणे या दोन्ही गोष्टींत महदंतर असते. तसाच काहीसा हा प्रकार आहे. आपल्याजवळील प्रशिक्षित मनुष्यबळ, मनुष्यबळरूपी भांडवल जीवाभावाने जपले पाहिजे, ही जाणीव भारतीय माहिती-तंत्रज्ञान तसेच माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवाउद्योगांना या मंदीमुळे ठसठशीतपणे झाली. मंदी काही कायम राहणारी नाही. ती आज ना उद्या ओसरेल. परंतु, ज्या मनुष्यबळात आपण गुंतवणूक केलेली आहे ते मनुष्यबळरूपी भांडवल जर का आपण आता आपल्या हाताने गमावले तर उद्या ऊर्जितावस्था आल्यानंतर हात चोळत बसण्याची पाळी आपल्यावरच येईल, हे भारतीय 'आयटी' उद्योगातील जवळपास सर्वच धुरीणांनी या काळात नेमकेपणाने हेरले. त्याचमुळे, उलाढालीवर मंदीचा परिणाम होऊनही एकाही अग्रगण्य 'आयटी' कंपनीने कपातीचा वरवंटा सरसकट फिरवण्याचा सपाटा लावला नाही. उलट, पुरेशा कामाअभावी रिकाम्या बसणा-या आपल्या कर्मचा-यांच्या कौशल्यांचा आलेख उंचावण्याचे उपक्रम कंपन्यांनी आवर्जून हाती घेतले.

पदरच्या मनुष्यबळाचा, त्याच्या उत्पादकतेचा ताळेबंद अधिक काटेकोरपणे मांडण्याकडे 'आयटी' कंपन्या संपूर्ण गेल्या वर्षात वळलेल्या दिसतात. कंपनीच्या कर्मचारी चमूतील प्रत्येक सदस्याच्या निर्मितीक्षमता व कल्पकतेचा, उपक्रमशीलतेचा तक्ता तपशीलवार मांडला गेला. समाधानकारक कामगिरीच्या ठरावीक स्तरापर्यंत पोहोचू न शकलेल्या कर्मचा-यांना त्यांचे ज्ञान व कौशल्य उंचावण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य करण्यासाठी तरतूद केली गेली. कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण-पुनर्प्रशिक्षणाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. आपल्या अंगभूत क्षमता व उत्पादकता सुधारण्याच्या संधी, याद्वारे, कर्मचा-यांना देण्यात आल्या. या सगळ्याचा लाभ उठवत आपल्या क्षमतांचा स्तर उंचावण्यासंदर्भात जे कर्मचारी अपयशी ठरले त्यांनाच सेवेमधून कमी करण्याचे अंतिम पाऊल मग 'आयटी'मधील काही अग्रगण्य कंपन्यांनी उचलल्याचे दिसते.

माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नसलेल्या कंपन्यांनीही या काळात आपले मनुष्यबळ टिकवून धरण्यासाठी कामगारांप्रतीचा आपला दृष्टिकोण बदलल्याचेही दिसून आले. मंदीच्या वातावरणाचा कंपनीच्या कारभारावर झालेला परिणाम, मंदीच्या काळात कर्मचा-यांप्रतीचे कंपनीचे भविष्यकालीन धोरण... अशा कामगारांच्या लेखी संवेदनशील असणा-या बाबींसंदर्भात कर्मचा-यांबरोबर खुला, पारदर्शक संवाद साधण्यावर विविध क्षेत्रांतील कंपन्यांनी भर दिल्याचे चित्र समोर येते आहे. आपल्या कर्मचा-यांचा विश्वास टिकवून ठेवणे, हे मंदीसारख्या प्रतिकूलतेवर मात करण्याच्या प्रयत्नांतील एक महत्त्वाचे साधन आहे ही खूणगाठ गेल्या वर्ष-दीडवर्षाच्या कालावधीत कॉर्पोरेट विश्वाने मनाशी बांधल्याची उदाहरणे वारंवार दिसली आहेत. बाजारपेठेतील आपली स्पर्धात्मकता टिकवून धरण्याच्या हेतूने उत्पादनखर्चात बचत साध्य करताना कामगारकपातीद्वारे मनुष्यबळावरील खर्चात घट घडवून आणण्याचा पर्याय कंपन्या पाणी अगदी नाकातोंडात जाऊलागले तरच अवलंबतात, असाही एक पैलू गेल्या वर्षभरात पृष्ठभागावर आलेला आहे.

एकंदरीनेच, उत्पादनखर्चाचे विलक्षण काटेकोरपणे सुसूत्रीकरण करणे आवश्यकच केवळ नव्हे तर अनिवार्यच आहे, हा सध्याच्या मंदीमधून भारतीय कॉर्पोरेट विश्वाने उचललेला दुसरा पाठ. यातून एक झाले आणि ते असे की, कंपन्यांच्या व्यवहारांत विविध स्तरांवर कळत-नकळत होणा-या अपव्ययांची जणू सूक्ष्मदर्शक यंत्रांद्वारे छाननी झाली. मंदी असो वा तेजी, केवळ एकाच बाजारपेठेवर विसंबून राहणे धोक्याचेच ठरते, हा व्यवहारातील पूर्वापार धडा अनेक कंपन्या १५ सप्टेंबर २००८ नंतर पुन्हा एकवार नव्याने गिरवू लागल्या. त्यातून, बाजारपेठेच्या वैविध्यीकरणाकडे भारतीय कंपन्यांची प्रवृत्ती बळावली. याचा एक साहजिक परिणाम असा झाला की, मागणी मलूल असली तरी जाहिरातींवरील खर्चात केलेली अनावश्यक आणि अतिरेकी कपात उपकारक ठरण्याऐवजी अपायकारकच ठरते, हेही ध्यानात आले. नवीन उत्पादनांसाठी हाती घ्यावयाच्या नवसंशोधनासही हाच काळ बरा, याचाही शोध भारतीय कंपन्यांना याच काळात लागला. एका मंदीने भारतीय कॉर्पोरेट विश्वाला इतके काही शिकवले. ■■



*(पृष्ठ क्रमांक १३ वरून)*

श्रमदलातील लिंग गुणोत्तर आरपार बदलून टाकणारा अगदी अलीकडचा अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे जगभरातील अर्थव्यवहारांत सेवाउद्योगांचे वाढलेले योगदान. जागतिकीकरणाद्वारे या प्रक्रियेला नवीनच आयाम लाभला. आज देशोदेशींच्या बाजारपेठांची परस्परांमध्ये व्यापक आणि सघन गुंफण होताना दिसते. देशोदेशीच्या बाजारपेठांमधील ग्राहक बहुढंगी आहेत. त्यातून, व्यापारउद्योगाचे क्षेत्रही बहुसांस्कृतिक बनते आहे. उद्योगांचा व्याप व रचना बहुराष्ट्रीय बनत असल्याने कंपन्यांच्या व्यवस्थापन रचना व प्रणालींमध्येही मूलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणणे अनिवार्य ठरते आहे. निराळ्या संस्कृतीमधील भागीदार, गुंतवणुकदार, पुरवठादार, ग्राहक, शासन व न्याययंत्रणा या सगळ्यांबरोबर व्यवहार करत असताना एक अतिशय लवचीक, स्पर्धेबरोबरच सहकार्य व उत्पादक स्वरूपाच्या साहचर्यावर भर देणारी कार्यसंस्कृती निर्माण करण्याचे आव्हान आजघडीच्या अग्रगण्य उद्योगांसमोर अग्रक्रमाने उभे ठाकते आहे.

जगभरातील श्रमदलाच्या बदलत्या तोंडवळ्याची बीजे या सर्वांगीण बदलाच्या प्रक्रियेत रुजलेली दिसतात. स्त्रीच्या अंगी जन्मजात असणारी, स्त्रीचीच म्हणून खास समजली जाणारी निसर्गदत्त गुणसंपदा व्यवसायक्षेत्राच्या आजच्या बदलत्या कार्यपद्धतीत मोलाची ठरते आहे. कंपन्यांचे आजचे उच्चस्तरीय व्यवस्थापन हे आक्रमकतेपेक्षा मतैक्यावर भर देणारे, स्पर्धात्मकतेपेक्षाही सहकार्याकडे कलणारे, अधिकारपदासाठीचे हपापलेपण जपण्याऐवजी समूहशक्तीच्या कारकतेवर (टीमवर्क) विसंबणारे असणे अगत्याचे बनते आहे. स्त्रीच्या अंगी हे सारे गुण स्वभावतःच वसत असतात. परिणामी, महिलाप्रणित व्यवस्थापनप्रणाली ही अधिक सहकार्यात्मक आणि परस्परसंवादप्रधान असते. आजच्या 'ग्लोबल' उद्योगांना सर्वाधिक गरज जाणवते आहे ती नेमक्या याच मानसिकतेची. चिनी तत्त्वज्ञानाची परिभाषा वापरावयाची तर, व्यवसायांना आज प्राधान्याने निकड आहे ती आक्रमक अशा 'यांग' या पुरुषतत्त्वापेक्षाही समावेशक, मार्दवयुक्त, सहकार्यप्रेरक स्त्रीतत्त्वाची - 'यिन्'ची ! जगभरच्या श्रमदलातील महिलांचा वाढता सहभाग ही त्या दिशेनेच होत असलेल्या प्रवासाची खूण समजावयाची का ? ■■

**संशोधन**

# गूढ चिन्हे उत्क्रांतीची

आपण सर्वजण विज्ञानयुगात राहात आहोत. आपले आजचे जीवन विज्ञानाने आणि त्याचबरोबर विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाने व्यापले आहे. माहिती-तंत्रज्ञानामुळे झालेल्या क्रांतीने जगात संवादाची अनेक दालने खुली केली आहेत. पिवळट पोस्टकार्ड आणि निळसर अंतर्देशीय पत्रे यांचा एक जमाना होता (तसा तो आजही काही प्रमाणात आहे). मात्र आताच्या गतिमान संवाद युगात महत्त्वाचे ठरत आहेत ते मोबाइल आणि ई-मेल. कमीत कमी शब्दांत निरोप पाठविणारे एसएमएस मोबाइलमुळे सर्वदूर पोहचले. एसएमएसची लोकप्रियता ध्यानात घेऊन तशाच धर्तीचे इंटरनेटवरील ट्विटरही संगणकाशी मैत्री असणा-यांच्या अंगवळणी पडले. पण हजारो वर्षांपूर्वी भाषेचा उगम झालेला नव्हता आणि निवा-यासाठी माणसे गुहा धुंडाळत होती तेव्हा माणसांच्या दैनंदिन व्यवहारांत कशा प्रकारचा संवाद असेल ? त्या काळात माणसांनी परस्परांना काही संदेश देण्याचा प्रयत्न कसा केला असेल ? अर्थात, या प्रश्नांची नेमकी उत्तरे मिळणे अवघडच आहे. पण, अनेक देशांमधील गुहांमध्ये काही विशिष्ट प्रकारची जी चिन्हे आजवर आढळली आहेत, त्यावरून पाषाणयुगातील माणसाने चिन्हांचा उपयोग करून काहीतरी संवाद साधण्याचा प्रयत्न केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे काही संशोधकांना वाटते.

आजच्या मानवाच्या पूर्वजांमध्ये (सनपूर्व सुमारे ३० ते ४० हजार वर्षे) स्वतःला अभिव्यक्त करण्याची क्षमता विकसित झाली म्हणून गुहांमध्ये चित्रे साकारली. या घटनेमुळे मानवाच्या उत्क्रांतीने आणखी एक पाऊल पुढे टाकले. या काळातील मानवांना Cro-magnon man असे संबोधले जाते. ही चित्रे म्हणजेच माणसांचा चित्रांद्वारे अभिव्यक्त होण्याचा प्रारंभ असे मानले गेले आहे. या तुलनेत अभिव्यक्त होण्यासाठी Pictographic writing म्हणजे चित्रलेखन हा प्रकार मात्र बराच अलीकडचा म्हणजे सुमारे पाच हजार वर्षांपूर्वीचा असावा, असे समजले जाते.



या पार्श्वभूमीवर, गुहांमधील चित्रकलाविषयक अभ्यास-संशोधन करताना गुहेतील लहान व अस्पष्ट अशा चिन्हांकडे संशोधकांचे फारसे लक्ष आजवर गेलेले नव्हते. अलीकडे मात्र या चिन्हांचा अभ्यास करण्यात येत आहे. गुहांमधील चित्रांसंदर्भात फ्रान्समधील गुहा प्रसिद्ध आहेत. अशा १४६ गुहांमधील सनपूर्व काळातील सुमारे ३५ हजार वर्षांपूर्वीच्या चिन्हांची माहिती एकत्र करण्यात आली. त्यावरून, अभ्यासकांना असे आढळले की किमान २६ चिन्हे ही बहुतांश सर्वच गुहांमध्ये एकाच पद्धतीने दगडांमध्ये कोरण्यात आली आहेत. वर्तुळ, फुली, सरळ रेषा, नागमोडी रेषा, लंबगोल, हाताची खूण इत्यादी विशिष्ट चिन्हे अनेक गुहांमध्ये दिसून आली. केवळ फ्रान्समध्येच नव्हे तर उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, स्पेन, इटली, आफ्रिका खंडातील काही देश, भारत, चीन, मलेशिया, ऑस्ट्रेलिया अशा अनेक देशांमधील विविध ठिकाणच्या गुहांमध्ये अशी चिन्हे आढळतात, असे अभ्यासकांनी नोंदले आहे. Genevieve Petzinger व्हिक्टोरिया विद्यापीठ, कॅनडा यांनी April Nowell यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन हाती घेतले आहे. यापूर्वी Clottes या संशोधकाने अशी चिन्हे असल्याचे नोंदवून ठेवले होते.

फ्रान्समधील चिन्हांचा अभ्यास करताना लक्षात आलेली उल्लेखनीय बाब म्हणजे काही चिन्हे संपूर्ण न काढता ती तुटक अशी काढण्यात आली आहेत. उदाहरणार्थ, हत्तीचे संपूर्ण चित्र न काढता हत्तीविषयक योग्य तो बोध होण्याच्या उद्दिष्टाने हत्तीचे फक्त सुळे काढणे. पण त्यावरून माणसाच्या पूर्वजांनी आपले काहीतरी विचार चित्रांच्या मदतीने इतरांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला असावा, असे संशोधकांना वाटते. हत्तीच्या सुळ्यांवरून कदाचित येथे हत्ती आहेत असे सुचवायचे असेल किंवा हत्तीची शिकार करण्यात आली आहे, असे सांगायचे असेल, असा अंदाज बांधता येतो.

काही ठिकाणी काही विशिष्ट चिन्हे गट असल्याप्रमाणे एकत्रितरीत्या आढळतात. संशोधकीय परिभाषेत, पाच बोटे दर्शविणारा सकारात्मक हात (positive hand) आणि काही बोटे बंद केलेला नकारात्मक हात (negative hand) असे मानले जाते. हा नकारात्मक हात आणि काही ठिपके हे अनेकदा एकत्र असल्याचे आढळले. विशेषतः, सनपूर्व २८ ते २२ हजार वर्षापूर्वी चिन्हांचा हा गट असल्याचे आढळले. काही ठिकाणी चार- पाच चिन्हांचा एक गट असल्याचे दिसून आले आहे. चिन्हांच्या अशा गटांद्वारे त्या काळातील माणसांना काहीतरी सांगावयाचे असावे, असा संशोधकांचा कयास आहे. विविध ठिकाणी आढळणारी ही चिन्हे म्हणजे आपल्या गटाचे त्या भौगोलिक क्षेत्रांत वर्चस्व आहे असेही सांगण्याचा प्रयत्न असू शकतो. ध्वनिरूप भाषेकडे जाण्याआधीची ही कदाचित पहिली पायरी असू शकेल, असेही मत मांडण्यात आले आहे.

कोणकोणती चिन्हे कोणत्या काळात आणि किती प्रमाणात आढळतात याबाबतही अभ्यास करण्यात येत आहे. फ्रान्समधील आतापर्यंतच्या संशोधनानुसार असे आढळले आहे की सनपूर्व ३० ते १० हजार वर्षापूर्वीच्या काळात सर्वांत जास्त आढळणारे चिन्ह एक रेषा (——) हे आहे. सुमारे ७० टक्के गुहांमध्ये हे चिन्ह आढळले. दुस-या क्रमांकावर खुला कोन (∨) आणि ठिपके ही चिन्हे असून ती सुमारे ४२ टक्के गुहांमध्ये आढळली. यांव्यतिरिक्त अन्य काही चिन्हे सुमारे एक-पंचमांश गुहांमध्ये असल्याचे संशोधकांनी नोंदले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे फ्रान्समध्ये काही विशिष्ट चिन्हे विशिष्ट ठिकाणीच आढळली आहेत. फ्रान्सच्या दक्षिण भागांत असणा-या गुहांमध्ये चिन्हे काढण्याची सुरुवात झाली असावी व मग ती इतरत्र पोहचली असावीत, असे संशोधकांना वाटते. फ्रान्समध्ये उत्तरेकडील भागांत बर्फाळ वातावरण असल्याने तेथे मानवी संस्कृतीचा व चिन्हांचा विकास झाला नसावा, असा अंदाज संशोधक व्यक्त करतात. येथे उल्लेखनीय बाब अशी की हजारो वर्षापूर्वी काढण्यात आलेली ही चिन्हे सुमारे तीन चतुर्थांश गुहांमध्ये आढळतात. ज्या काळात गुहांमधील चित्रनिर्मितीचा प्रारंभ झाला त्या काळापूर्वीच मानवसमूहांमध्ये चिन्हांचा वापर रूढ झाला असावा, असेही मत संशोधकांनी मांडले आहे.



म्हणजे, चित्रांद्वारे स्वतःला अभिव्यक्त करण्याची मानवसमूहांची क्षमता तीस ते चाळीस हजार वर्षापूर्वीची असली तरी चिन्हांद्वारे अभिव्यक्त करण्याची क्षमता त्या आधीच्या काळातील असावी, असे म्हणण्यास जागा आहे, असे काही संशोधकांना वाटते. या अंदाजाची पुष्टी करणारी काही माहिती अलीकडेच पुढे आली आहे. आफ्रिका आणि मध्य आशियातील उत्खननात सापडलेल्या सुमारे ७५ हजार वर्षापूर्वीच्या दगडांमध्ये काही चिन्हाकृती दिसून आल्या आहेत. तसेच, इस्रायल येथे सापडलेल्या सुमारे एक लाख वर्षापूर्वीच्या दागिन्यांसदृश वस्तूंवरही चिन्हाकृती आढळल्या आहेत. या शिवाय, अन्य काही देशांमध्येही अशी चिन्हे आढळली आहेत. त्यामुळे मानवसमूहांनी आफ्रिकेबाहेर स्थलांतर केले तेव्हा चिन्हांचाही प्रवास त्यांच्याबरोबर झाला असावा, असे काही संशोधकांना वाटते. तर, काहींच्या मते वेगवेगळ्या ठिकाणच्या मानवसमूहांमध्ये झालेला हा आकलनात्मक बदल असावा. चित्राद्वारे अभिव्यक्त करण्याची मानवाची क्षमता तीस ते चाळीस हजार वर्षापूर्वी अचानकच आकाराला आली असावी, असे संशोधकांचा हा गट मानतो. चिन्हांविषयक अभ्यास करणारे संशोधक Clottes यांच्या मते माणसाचा अभिव्यक्त होण्याचा इतिहास अधिक जुना असावा. सुमारे दोन लाख वर्षापूर्वीपासून मानवांचे वास्तव्य पृथ्वीवर असेल तर त्यांच्या अभिव्यक्तीचा इतिहासही तेवढा जुना असू शकतो. पण येथे एक प्रश्न असा निर्माण होतो की मानवसमूहांनी दगडात कोरलेली चिन्हे सापडतात, तसा अन्य कोणता पुरावा का सापडत नाही. Clottes यांच्या प्रतिपादनानुसार असे काही पुरावे अन्य काही वस्तूंवर असतीलही पण त्या वस्तू काळाबरोबर नष्ट झाल्या असतील.

या चिन्हांच्या माध्यमातून मानवांना नेमका कोणता संदेश द्यायचा असेल ही बाब मात्र या संशोधनांतून स्पष्ट झालेली नाही. काहींच्या मते हे चिन्हांकित संदेश दैनंदिन जीवनव्यवहारांशी संबंधित असावेत तर काहींच्या मते ही चिन्हे अ-मानवी कल्पनेशी संबंधीत असण्याची शक्यता आहे. तर काहींच्या मते शत्रुपक्षातील टोळीमध्ये संभ्रम निर्माण करण्याच्या हेतूनेही अशी चिन्हे दगडांमध्ये कोरण्यात आली असावी. यावर अधिक संशोधन होऊन चिन्हांचे हे गूढ उकलेल अशी आशा करता येईल. ■■

अर्थबोधपत्रिका खंड ९ अंक १ - एप्रिल २०१०

राजकीय

# धार्मिक मूलतत्त्ववादाविषयी...


अर्थबोधपत्रिका खंड ९ अंक १ - एप्रिल २०१०

प्राणीजीवन

# संवादी मूषक

संगणकाच्या आजच्या काळात मूषकाशिवाय (माऊस) आपले काम होत नसल्याने तो सर्वांचा मित्र बनला आहे. 'गणपतीचे वाहन' अशी या छोट्या दोस्ताची मोठी ओळख आहेच. 'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' या न्यायानुसार सापाला शेतक-याचा मित्र बनविण्यासही मूषकच कारण ठरला आहे. शेतक-याने अतिशय कष्टाने पिकविलेले अन्नधान्य उंदीर फस्त करतात आणि उंदरांना गिळंकृत करून साप अन्नधान्य वाचवितात म्हणून सापाला 'शेतक-याचा मित्र' म्हटले जाते, हे उत्तर प्रत्येकाने एकदातरी शालेय वयात वाचले-लिहिले असते. प्रयोगशाळेत या चतुष्पादावर अनेक प्रयोग केले जात असल्याने विज्ञान-संशोधनांतही तो महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. उदरभरणासाठी भटकंती करत असताना माणसाची चाहूल लागताच धूम ठोकणारा आणि शक्यतो बिळात दडून बसणारा हा प्राणी समाजप्रिय आहे. त्यामुळे एकटे राहण्यापेक्षा गटात, टोळीत राहणे त्याला आवडते. अशा या मूषकांच्या वर्तनाचा अभ्यास प्राध्यापक-संशोधक Con Slobodchikoff करीत आहेत.

उत्तर अमेरिकेत Gunnison's prairie dog या जातीचे मूषक आढळतात. सपाट माळरानावर, शेकडो किलोमीटर अंतरावर पसरलेल्या उंदरांच्या वस्त्या त्या भागांत आहेत. काही वर्षांपूर्वी या उंदरांची संख्या एकदम खालावली ती शिका-यांच्या बंदुकीतील गोळ्यांना बळी पडल्याने. ही बाब लक्षात आल्यानंतर तेथे शिकारीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. या मूषकवस्तीचा अभ्यास करताना Con व त्यांच्या सहका-यांना काही मजेशीर बाबी लक्षात आल्या. या उंदरांचे नाव जरी Gunnison's prairie dog असे कुत्र्यांवरून ठेवण्यात आले असले तरी ते दिसतात मात्र खारीसारखे. खारींसारखेच ते दोन पायांवर उभे राहतात. त्यांची बिळे छोटी असतात, त्यात खाऊ साठविला जात नाही.



छोटीशी शेपटी असणारे हे उंदीर समाजप्रिय असतात. उंदरांच्या मोठ्या वस्तीत अनेक गट/समूह असतात. या गटांमध्ये उंदरांचे एक कुटुंब असते असे आतापर्यंत मानले जात होते. पण Con यांनी या उंदरांच्या जनुकांचा अभ्यास केला असून त्यांच्या मते प्रौढ उंदरांचे वर्तन या संदर्भात वेगळे असते. एखाद्या गटात प्रजननाच्या संदर्भात नर व मादी उंदरांची एकच जोडी कधी प्रभावी असते. तर कधी एक नर व अनेक माद्या, तर कधी अनेक माद्या अनेक नर, अशा कोणत्याही जोड्या प्रजननाचा भार सांभाळत असतात. अशा प्रकारे जे उंदीर नात्यांत बांधले जात नाहीत ते सर्व उंदीर आपल्या गटाचे. स्थळाचे, जागेचे रक्षण करण्यास सक्षम व तयार असतात. मानवी समाजात जसे कुटुंबाशिवाय अन्य सामाजिक संबंध प्रस्थापित होतात, तसेच काहीसे या मूषकवस्तीत घडून येत असल्याचे आढळते. संकट दिसले की इतर उंदरांना संदेश देण्यासाठी हे Gunnison's prairie dog दोन पायांवर उभे राहून विशिष्ट प्रकारचा आवाजही करतात. त्यांचे विविध आवाज हे त्यांचे विविध संदेश असू शकतात असे Con यांना वाटते. उंदरांच्या या संदेशरूपी भाषेचा शोध हा Con यांच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे.

शब्दरूप भाषा हे फक्त मानवी समाजाचे वैशिष्ट्य आहे, असे मानले जाते. पण या उंदरांचीही विशिष्ट प्रकारे ओरडण्याची एक भाषा आहे, असे संशोधकांना वाटते. उदाहरणार्थ, आपल्या मूषकसमाजाचे रक्षण करण्यासाठी विशिष्ट आवाजांद्वारे काही धोक्याचे संदेश मूषकांकडून दिले जातात. हे कसे घडते याचा अभ्यास करण्यासाठी Con यांनी एक प्रयोग केला. उंदरांना खाणा-या अन्य प्राण्यांच्या प्रतिकृती त्यांनी मूषकवस्तीनजीक ठेवल्या. त्यांना पाहून मूषकांनी जे वेगवेगळे आवाज काढले त्यावरून संगणकावर सोनोग्राम (आवाजाच्या मदतीने काढलेली चित्रे) काढण्यात आले. मूषकांचा प्रत्येक ध्वनी हा एक स्वतंत्र शब्द नसून ते जणू एक संपूर्ण वाक्य असते. त्या वाक्यातून शत्रू कोण आहे, तो आकाराने किती मोठा आहे, त्याचा रंग कोणता आहे, चालण्याचा वेग कसा आहे आणि त्याची दिशा कोणती आहे इत्यादी अनेक बाबी ते परस्परांना सांगत असतात, असे Con यांना वाटते.

लहान पिलांनादेखील अशाच प्रकारे काही सांगता येते का, याचाही शोध घेण्याचा प्रयत्न या वेळी करण्यात आला. त्यांना असे आढळले की उंदरांची पिले आणि प्रौढ उंदीर यांच्या आवाजात जाणवण्याइतका फरक असतो. सोनोग्रामवरून हे अधिक स्पष्ट झाले. भाषा शिकण्यापूर्वीच्या काळात लहान मुले जसे वेगवेगळे अस्पष्ट उच्चार करीत असतात त्याप्रमाणे उंदरांची पिले वेगळे आवाज काढत असतात. जणू त्यांनाही काहीतरी सांगायचे असते, अशा प्रकारचे हे आवाज असतात. तसेच, वेगवेगळे आवाज काढून प्रौढ उंदीर जे काही सांगण्याचा प्रयत्न करीत असतात त्याचे आकलनही ही लहान पिले सुयोग्य पद्धतीने करतात असे नाही. पिले मोठी होतात तेव्हा मात्र त्यांचे आवाज प्रौढ उंदरांप्रमाणे असतात असेही या अभ्यासातून आढळले आहे. त्यामुळे या गटातील उंदरांचे वेगवेगळे आवाज ही एकप्रकारे त्यांची भाषा असते असे Con यांना वाटते.

प्रौढांची भाषा न शिकलेल्या लहानग्या पिलांची काळजी घेण्याचे काम मादी करते. ही उंदीरमाता अतिशय सजगतेने पिलांना लहानाचे मोठे करते. जन्म झाल्यानंतर तीन आठवड्यांनी पिले बिळाबाहेर डोकावू लागतात. संकटांच्या वेळी पिलांना सावध करण्याचा मादी उंदरांचाही एक विशिष्ट असा आवाज असतो. तो आवाज नर उंदरांच्या आवाजापेक्षा काहीसा वेगळा असतो. ज्या माद्यांना पिले झालेली नसतात त्या असा विशिष्ट आवाज करीत नाहीत. संकटांची चाहूल लागताच त्या संकटानुसार वेगवेगळे आवाज करून ते अन्य उंदरांना सावध करतात. त्यांच्या आवाजात चढउतार असतात तसेच त्यातून दोन-तीन वेगळे उच्चारही कळून येतात. त्यांचा आवाज सुमारे एक मैल अंतरापर्यंत पोहचू शकतो. कधी कधी अर्धा-अर्धा तास उभे राहून ते असे संदेश देत असतात. संकट जवळ येऊ लागताच त्यांच्या आवाजाची तीव्रताही वाढते. हे उंदीर हुषार असतात. सभोवतालच्या माणसांचा आपल्याला धोका आहे वा नाही हे त्यांना लगेच कळते; तसेच, सभोवतालची रंगसंगतीही त्यांना समजू शकते. संवाद साधण्यात पटाईत असलेल्या या मूषकांचे आयुर्मान ३ ते ५ वर्षांचे असते. माणसांच्या शिकारीच्या मोहाला बळी पडलेल्या या उंदरांना वाचवून जैववैविध्य कायम राखण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. ■■



(पृष्ठ २८वरून)

दृष्टिक्षेप

# वार्षिक कामगिरीचा लेखाजोखा (एप्रिल २००९ ते मार्च २०१०)

'अर्थबोधपत्रिके'च्या आठव्या खंडात सादर केलेल्या वाचनसाहित्याचा ताळेबंद इथे मांडला आहे. खरे म्हणजे ही एक उजळणी होय. आपण काय काय वाचले याची उजळणी वाचकांच्या दृष्टीने तर, साक्षेपी वाचकवर्गाला आपण काय काय वाचनवानोळा सादर करू शकलो, याचा आढावा संपादकमंडळाच्या दृष्टीने.

**(१) प्रकाशित साहित्य** - एप्रिल २००९ ते मार्च २०१० या वर्षभराच्या काळात प्रकाशित झालेल्या १२ अंकांमध्ये एकंदरीने ७६ लेख समाविष्ट करण्यात आले होते. 'जिकडेतिकडे' या सदरात अंतर्भूत असलेली सहा स्फुटे वेगळीच. वर्षभरात वाचकांनी पाठविलेली सहा पत्रेही या अंकांत प्रकाशित करण्यात आली. पत्रांच्या माध्यमातून वाचकांची मते, प्रतिक्रिया वाढत्या प्रमाणात कळाव्यात अशी इच्छा नेहमीच असते. मात्र, २००८-०९ सालाप्रमाणेच २००९-१० या वर्षीही वाचकपत्रांची संख्या अगदी मोजकीच राहिली. विविध लेखांद्वारे ज्या अभ्यासप्रांतांची सफर आपण केली त्यांचा आलेख पुढील तक्त्यात सादर केला आहे. एकूण १५ प्रांतांतील घडामोडींचा विविधांगी परिचय करून घेण्याचा प्रयत्न या ७६ लेखांद्वारे करण्यात आला.

२००८-०९ या वर्षात प्रकाशित झालेल्या 'अर्थबोधपत्रिके'च्या आठव्या खंडातील १२ अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांची संख्या होती ५६. 'जिकडेतिकडे' या सदरातील स्फुटे होती १०. अभ्यासविषयांचा विचार केला तर, विविध अशा १३ ज्ञानप्रांतांमधून आपण फेरफटका मारला होता.

**(२) विविध देशांचा फेरफटका** - जागतिकीकरणाच्या आजच्या युगात जगाचे नागरिक बनलेल्या आपल्या सर्वांना जागतिक स्तरावरील विविध घडामोडींची जाणीव असणे हे गरजेचे आहे. त्या नुसार, जगभरात कुठे काय विषय महत्त्वाचे ठरत आहेत, विविध देशांमधील राजकीय स्थिती काय सांगते असा विचार करून अर्थबोधपत्रिकेत काही देशांबाबत लेख प्रसिद्ध



**अर्थबोधपत्रिका खंड ८ (एप्रिल २००९ -मार्च २०१०)**
**प्रकाशित लेखांचे विषयवार वर्गीकरण (एकूण लेखसंख्या - ७६)**

| अ. क्र. | विषय | लेखसंख्या | लेखांमधील विषय |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक | ११ | आंतरराष्ट्रीय स्थलांतर, अन्नधान्य, सोन्याच्या खाणींबाबत, आरक्षण, ज्येष्ठ नागरिक व निवृत्तीवेतन, चीनमधील तरूण मन, विस्थापनाचे स्त्रियांवरील परिणाम, लघुवित्त व मनुष्यबळ, विस्थापन, लोकशक्तीची नवमाध्यमे, |
| २ | आर्थिक | १३ | शहरांमधील बचतगट, आर्थिक मंदी, विकास व विस्थापन, विकास व क्षमता, स्थलांतरितांचा सहभाग, किरकोळ व्यापार, क्रेडिट कार्ड |
| ३ | राजकीय | १० | दहशतवाद, चीनचे धोरण, अमेरिकेची धोरणे, भारतातील पक्षीय व्यवस्था, प्रादेशिक पक्षांचा उदय, आघाड्यांचे राजकारण, निवडणूक सुधारणा, प्रमाणशीर प्रतिनिधित्व, धार्मिक मूलतत्त्ववाद |
| ४ | पर्यावरण | १२ | जागतिक सुरक्षितता, विविध देशांमधील प्रश्न, आव्हान पर्यावरण रक्षणाचे, आव्हान जैववैविध्य रक्षणाचे, वनरक्षण, दीर्घकालीन धोरण, पर्यावरणीय कृतिशीलता, पर्यावरणीय ग्रंथ |
| ५ | सांस्कृतिक | ६ | खरेदीसंस्कृती, खाद्यसंस्कृती, कलाविश्व, |
| ६ | आरोग्य | १ | धोका किरणोत्सर्गाचा |

| अ. क्र. | विषय | लेखसंख्या | लेखांमधील विषय |
|---|---|---|---|
| ७ | विज्ञान-संशोधन | ११ | वंश व बुद्धिमत्ता, आरोग्यविषयक नवसंशोधन, मेंदूतील घड्याळविषयक संशोधन, विज्ञान व अध्यात्म, क्रेडिट कार्ड, मोबाइलचे तंत्रज्ञान, विज्ञान व शिक्षण, सहकार्यामागील विज्ञान, विज्ञान व वनसंवर्धन |
| ८ | कृषी | ३ | अन्नही हवे व पाणीही हवे, कृषिमित्र ॲग्रीबो, गहू-उत्पादनातील समस्या |
| ९ | शिक्षण | २ | पालकांचा सहभाग, शाळा घरोघरी |
| १० | तंत्रज्ञान | २ | युवक आणि तंत्रज्ञान, नागरिकांची माहिती मिळविणारे तंत्रज्ञान |
| ११ | नागरीकरण | १ | शहरीकरण व ज्येष्ठ नागरिक |
| १२ | धर्मविचार | १ | रशियातील ऑर्थडॉक्स चर्च |
| १३ | अन्नसुरक्षा | १ | अन्नधान्याची उपलब्धता महागाई |
| १४ | जलसुरक्षा | १ | पाण्याची उपलब्धता वापर व वाढती लोकसंख्या |
| १५ | प्राणीजीवन | १ | अस्वलकथा |



करण्यात आले. भारत, रशिया, इराण, चीन, अमेरिका, स्पेन, जपान, फ्रान्स, इटली, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, नेपाळ इत्यादी १३ देशांमधील विविध घटना-घडामोडींवर आधारित लेख प्रसिद्ध करण्यात आले.

**(३) विशिष्ट विषयांवर प्रकाश टाकणारे अंक** - 'अर्थबोधपत्रिका' हे नियतकालिक असले तरी दर महिन्याच्या अंकातील प्रत्येक लेखाला काहीएक शब्दमर्यादा पाळावीच लागते. त्यामुळे, काही अभ्यासविषयांच्या तपशीलवार उहापोहास मर्यादा पडतात. यावर उपाय म्हणून, शक्यतो, एकाआड एक अंक हा एखाद्या विविक्षित विषयाच्या सांगोपांग विवेचनास प्राधान्य देणारा असावा, असा प्रयत्न अलीकडील काही वर्षे सुरू आहे. त्यानुसार, २००९-१० या वर्षात अशा स्वरूपाचे पाच अंक वाचकांना सादर करता आले, याचे समाधान आहे. वैश्विक मंदी आणि पर्यावरणाचा -हास यांमुळे उभे ठाकत असलेले दुहेरी संकट (मे २००९), भारतातील प्रचलित पक्षपद्धती आणि प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे देशातील राजकीय प्रक्रियेला लाभलेली विविध परिमाणे (सप्टेंबर २००९), आपली बदलती खरेदी संस्कृती आणि खाद्य संस्कृती (ऑक्टोबर २००९), अन्नसुरक्षा (डिसेंबर २००९) आणि विज्ञान-बोध विशेषांक (फेब्रुवार २०१०) हे ते पाच अंक होत.

**(४) संदर्भ साहित्यः** 'अर्थबोधपत्रिके'तील साहित्य हे स्वरूपतःच आधारित साहित्य असते. २००९-१० या वर्षभरादरम्यान प्रसिद्ध झालेल्या १२ अंकांतील वाचनसाहित्य निर्माण करण्यासाठी वापरण्यात आलेल्या आधारभूत साहित्याचे स्त्रोतनिहाय वर्गीकरण पुढीलप्रमाणेः

**(अ) देशी-विदेशी अशी एकूण १६ नियतकालिके** - नॅशनल जिऑग्राफिक, नेचर, करंट हिस्टरी, इकॉनॉमिस्ट, न्यू सायंटिस्ट, प्रॉस्पेक्टस्, न्यू स्टेटस्मन, फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू, इकॉलॉजिस्ट, बीबीसी वाइल्डलाइफ, डाउन टू अर्थ, सर्व्हायव्हल, जिऑग्राफिकल, जर्नल ऑफ एशियन स्टडीज, करंट सायन्स, द वॉशिंग्टन क्वार्टरली

**(ब) पुस्तके/अहवाल** - २४ : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमधील समृद्ध ग्रंथालयात वेळोवेळी दाखल होणा-या नवनवीन व उत्तमोत्तम ग्रंथांचा मोठाच आधार 'अर्थबोधपत्रिके'साठी वाचनसाहित्य तयार करण्यात नेहमीच लाभतो.

**(क) संस्थळे (वेबसाइटस्) एकूण** - ३३ ■■

## प्रमुख संदर्भ

**(A) Magazines**: (1) The Economist - January 2ND-8TH 2010, January 30th 2010
(2) NewScientist, 20 February 2010,
(3) BBC Wildlife, February 2010
(4) Business Today : 18th Anniversary Issue, January 10, 2010.
**(B) Books/Reports** :
(1) The Turning Point: Science, Society, And the Rising Culture, by Fritjof Capra, Bantam Books, 1982
(2) समाजवाद काळाःगोरा, लेखक - डॉ. राममनोहर लोहिया, संकलन व अनुवाद - श्रीपाद केळकर/इंदुमती केळकर, प्रेस्टीज पब्लिकेशन्स पुणे, तृतीयावृत्ती मार्च, १९९३.
**(C)Websites:**(1)www.enature.com
(2) http://en.wikipedia.org
(3)www.neogaf.net
(4)www.stonepages.com (5)www.findarticles.com

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.



**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर    नीळकंठ रथ

पृष्ठे १४०    किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** **फक्त १०० / - रुपये**
**द्वैवार्षिक वर्गणी** **फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट**
**त्रैवार्षिक वर्गणी** **फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**
**पंचवार्षिक वर्गणी** **फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)